# पुणे विद्यापीठ

दूरध्वनी : २५६०१२६१
तारेचा पत्ता : 'युनिपुना'
फॅक्स : ०२०.२५६९३८९९

गणेशखिंड,
पुणे ४११००७

संदर्भ क्र. शै.प्रवेश/९०३६ दिनांक : २५.८.२०११

**तातडीचे स्मरणपत्र—२**

प्रति,

१. मा. विभागप्रमुख,
सर्व शैक्षणिक विभाग,
पुणे—४११ ००७.

२. मा. प्राचार्य,
सर्व संलग्नित महाविद्यालये,

**विषयः— एम.फिल. अधिछात्रवृत्ती २००८—२००९ व २००९—२०१० चा लाभ घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या प्रबंध व प्रगती अहवालाबाबत**
**संदर्भः— शै. प्रवेश/३००२, दि. १५/०७/२०११ चे पत्र**
**शै. प्रवेश/४४७४, दि. ५/०८/२०११ चे पत्र**

महोदय,

उपरोक्त संदर्भीय पत्रानुसार शैक्षणिक वर्ष २००८—२००९ व २००९—२०१० मध्ये एम.फिलच्या अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना त्या वर्षातील संशोधनाबाबत प्रगतीचे अहवाल (Progress Reports) विद्यार्थ्यांचे तीन वर्षात एम.फिल. अभ्यासक्रम पूर्ण करून प्रबंध सादर केला असल्यास त्या बाबतची माहिती शैक्षणिक प्रवेश विभागाकडे पाठवण्याबाबत कळविण्यात आले होते. परंतु सदर माहिती शैक्षणिक प्रवेश विभागास अनेक विभागांकडून अदयाप प्राप्त झालेली नाही. सदर माहिती शैक्षणिक प्रवेश विभागास पाठविणे प्रंचलित नियमानुसार अनिवार्य आहे.

वरील माहिती संबंधित विभागाने द्यावी. अन्यथा त्यांच्या विभागातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्ष २०१०—२०११ मधील अधिछात्रवृत्ती देण्यासंबंधी कार्यवाही करणे अडचणीचे होईल. याची कृपया नोंद घ्यावी, ही विनंती.

कळावे,

आपला विश्वासू,
२४।८।११
उपकुलसचिव
शैक्षणिक प्रवेश विभाग